महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थापना-
मंत्रालयीन स्तरावर पदे निर्माण करण्या-
साठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अग्रिमा
नुसार उपलब्ध झालेले अनुदान नियंत्रण
अधिका-याकडे सुपूर्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-मप्रन्या-१०८९/सीआर-२८ / १६[अ],
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- १८ जुलै, १९८९.

शासन निर्णय:-

शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांच्या सेवा विषयक तक्रारींचा विचार करून त्यावर निर्णय देण्यासाठी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण स्थापन करण्याच्या शासनाच्या निर्णयानुसार, नवी मुंबई येथे न्यायाधिकरणाचे कार्य सुरु करावयाचे आहे. त्या संदर्भात मंत्रालयीन स्तरावर लागणा-या कर्मचारी वर्गाच्या वेतनादि खर्चाच्या पूर्तीसाठी पुढील अधिवेशनापर्यंत [म्हणजे जुलै ते नोव्हेंबर १९८९ ह्या कालावधीत] कराव्या लागणा-या खर्चाकरिता शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक आकनि-११८९/५०/अर्थसंकल्प-१३, दिनांक १५ जुलै १९८९ अन्वये रुपये ६२,०००/- [रुपये बासष्ट हजार फक्त] इतका अग्रिम आकस्मिकता निधीमधून मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार उपलब्ध झालेले अनुदान रुपये ६२,०००/- [रुपये बासष्ट हजार फक्त] हे उप सचिव सामान्य प्रशासन विभाग [आस्थापना] यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

२. ह्यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक ए-७-२०५२-सचिवालय सर्वसाधारण सेवा - [०९०] सचिवालय [१] सामान्य प्रशासन विभाग" ह्या लेखा शीर्षाखाली दाखविण्यात यावा. ह्या अग्रिमाची प्रतिपूर्ती विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात सामान्य प्रशासन विभागामार्फत पूरक मागणी सादर करून करण्यात येईल.

३. नियंत्रक अधिका-यांनी आकस्मिकता निधी मधील अग्रिमाबाबत महाराष्ट्र बजेट मॅन्युअल १९७७ [खंड-१] च्या परिच्छेद १९१ मध्ये नमूद केलेली कार्यपद्धती अवलंबावयाची आहे. ह्या अग्रिमातून प्रत्यक्ष खर्च केलेल्या मासिक खर्चाची एकत्रित माहिती त्या महिन्याच्या नंतरच्या १५ तारखेपर्यंत ह्या कार्यासनाकडे तसेच वित्त विभागाकडे पाठवावी. अग्रिमातून कोणत्या दिनांकास खर्च करण्यास सुरुवात केली त्याची माहितीही ह्या कार्यासनाकडे कळवावी.

उप सचिव सामान्य प्रशासन विभाग [आस्थापना] यांनी आकस्मिकता निधीमधून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिका-याकडे रक्कम सुपूर्द करण्याच्या [illegible] रकमेतून खर्च करताना सादर करण्यात येणा-या देयकावर [illegible] आकनि-११८९/५०/

अर्थसंकल्प-१३, दिनांक १५/५/८९ अन्वये असे लाल शाईने लिहावे.
अशी स्पष्ट सूचना त्या आदेशात/पत्रात अंतर्भूत करावी व ही सूचना
लाल शाईने अधोरेखित करावी.

४. आकस्मिकता निधीतील अग्रिमाची रक्कम खर्च न करता तशीच पडू देणे अनुज्ञेय नाही. त्याचप्रमाणे आवश्यकतेपेक्षा जास्त असलेली रक्कम वित्त विभागाकडे परत करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अग्रिमाच्या रकमेपेक्षा जास्त रक्कम खर्च करणेही अनियमित आहे. नियंत्रक अधिका-यांनी मार्चअखेरपर्यंत लागणा-या रकमेचा तपशील सामान्य प्रशासन विभागाकडे १५/८/८९ पर्यंत कळवावा. म्हणजे अग्रिमाची रक्कम वेळेवर वाढविणे अथवा कमी करणे शक्य होईल.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-सीआर-८८५/व्यय-४, दिनांक १३/७/८९ अन्वये प्राप्त झालेल्या त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य १ मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य २ नागपूर,
महालेखापाल [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य १ मुंबई.
महालेखापाल [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य २ नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग [कार्यासन क्रमांक-अर्थसंकल्प-३, अर्थसंकल्प-१३ व व्यय-४],
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग [आस्थापना],
सामान्य प्रशासन विभाग [कार्यासन क्रमांक ३५, ३६ व १९]
सह संचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष,
नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला [दोन प्रती].